# नियमित दिवाणी दावा क्र.४५/२०१४ मधील निशाणी ९८ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१ शंकर गंगाराम डोंगरे हे दिनांक १२.०८.२०२२ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमूद केलेले वारस हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जात नमूद केलेल्या वारसांना या कामी समाविष्ट करण्याची विनंती वादी यांनी केली आहे. प्रतिवादी यांनी या अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी क्र.१ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर केली आहेत. अभिलेखातील निशाणी १०१ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहता प्रतिवादी क्र.१ शंकर गंगाराम डोंगरे हे दिनांक १२.०८.२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांनी दावा मिळकतींचे वाटप होवून प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :-

## आ दे श

१. वादी यांचा निशाणी ९८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आज पासून चौदा (१४) दिवसांचे आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.01.10 17:15:06 +0530

**दिनांक : १०.०१.२०२३** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः वडवणी** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**

**ता. वडवणी, जि.बीड.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 10.01.2023 |
| Transcribed on | : | 10.01.2023 |
| Checked and signed on | : | 10.01.2023 |